# <u>ठाणे महानगरपालिका, ठाणे</u>

## <u>मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा</u>
## <u>सभा सुचना क्र. ०६ दिनांक ०४/०९/२०१०</u>
## <u>सभा क्रमांक ०६ दिनांक ०९/०९/२०१०</u>

**सन्मा. श्री. /श्रीमती --------------------------------------**

सदस्य / सदस्या - वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा **गुरुवार दिनांक ०९/०९/२०१० रोजी सकाळी ११.३० वा.** वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, २ रा मजला, येथे सभा सुचना क्र. ०६ दिनांक ०४/०९/२०१० च्या सोबतच्या विषय पत्रिकेवरील विषयावर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

मा. अध्यक्ष महोदय यांचे आदेशान्वये.

सही /-
**प्रभाग अधिकारी**
वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

## <u>सभा सुचना क्रमांक ०६ दिनांक ०४/०९/२०१० ची विषय पत्रिका.</u>

| <u>प्रकरण क्रमांक</u> | <u>विषय</u> |
|---|---|
| ११२. | ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. ०५ दिनांक २६/०८/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. |

सही /-
**प्रभाग अधिकारी**
वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. वर्तकनगर प्रभााग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- ०४/०९/२०१०

**<u>सोबत</u> :-** सभा क्र. ०५ दिनांक २६/०८/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

वर्तकनगर प्रभाग समिती,
दिनांक :- ०९/०९/२०१०

**मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा**
**सभा सुचना क्र. ०६ दिनांक ०४/०९/२०१०**
**सभा क्रमांक ०६ दिनांक ०९/०९/२०१०**

**सन्मा. श्री. /श्रीमती --------------------------------------**

सदस्य/सदस्या - वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिकेच्या वर्तकनगर प्रभाग समितीची सभा गुरुवार दिनांक ०९/०९/२०१० रोजी सकाळी ११.३० वा. वर्तकनगर प्रभाग समिती कार्यालय लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह, येथे सभा सुचना क्रमांक ०६ दिनांक ०४/०९/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

**सदर सभेस उपस्थित असलेले सदस्य :-**

| | | |
|---|---|---|
| **१)** | **सन्मा. श्री. हरीश्चंद्र श्रीपत पाटील** | **अध्यक्ष** |
| २) | सन्मा. श्री. रामभाऊ लहु फडतरे | सदस्य |
| ३) | सन्मा. सौ. ताई मारुती भोंडवे | सदस्या |
| ४) | सन्मा. सौ. अनिता अशोक सावंत | सदस्या |
| ५) | सन्मा. श्री. नागसेन गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ६) | सन्मा. सौ. वनितातार्इ गंगाराम इंदिसे | सदस्या |
| ७) | सन्मा. श्री. संतोष वसंत वडवले | सदस्य |
| ८) | सन्मा. श्री. संजय तुकाराम कदम | स्वि. सदस्य |
| ९) | सन्मा. श्री. सुनिल आबाजी शिंदे | स्वि. सदस्य |

**सदर सभेस अनुपस्थित असलेले सदस्य :-**

| | | |
|---|---|---|
| १) | सन्मा. श्री. दिनेश मनोहर पाथरे | सदस्य |
| २) | सन्मा. श्री. सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| ३) | सन्मा. श्रीमती. छाया मनोहर राव | सदस्या |
| ४) | सन्मा. श्री. सुरेश दाजी भोईर | सदस्य |
| ५) | सन्मा. सौ. परिषा प्रताप सरनाईक | सदस्या |
| ६) | सन्मा. श्री. सुधीर प्रल्हाद बर्गे | सदस्य |
| ७) | सन्मा. श्री. दशरथ बाबुराव पालांडे | सदस्य |
| ८) | सन्मा. कु. योगिता रमेश वैती | सदस्या |
| ९) | सन्मा. श्री. संतोष हरिश्चंद्र मोरे | स्वि. सदस्य |

**प्रभाग अधिकारी श्री. बाबासाहेब आंधळे मा. अध्यक्ष सो. यांचे परवानगीने सभा क्र. ६ चा अजेंडा वाचून सभेला सुरुवात करतात.**

**प्रभाग अधिकारी विषय पत्रिकेवरील विषय क्र. ११२ वाचून दाखवितात.**

**सर्वानुमते मंजुर**

**प्रभाग अधिकारी श्री. बाबासाहेब आंधळे मा. अध्यक्ष सो. यांचे परवानगीने आयत्यावेळी आलेले विषय मंजुरीसाठी वाचून दाखवतात.**

**प्रभाग अधिकारी आयत्यावेळी आलेले विषय क्र. ११३, ११४, ११५, ११६, ११७, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२३, १२४, १२५ व १२६ वाचून दाखवितात.**

**सर्वानुमते मंजुर**

**श्री. बाबासाहेब आंधळे** (प्रभाग अधिकारी) **:-**

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे यांनी आजच्या सभेला उपस्थित राहू शकणार नसल्याचे कळविले असून त्यांनी यापूर्वीच्या सभेत परिवर्तन इमारतीबाबत उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत संबंधित अधिका-यांकडून सदरची कामे करवून घेणे व अधिका-यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कारवाई झाली अथवा कसे ? याबाबत सभेमध्ये विचारणा करण्यात येवून लेखी कळविणे बाबत लेखी पत्र दिलेले आहे. तसेच अधिका-यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कारवाई न झाल्यास पुढील सभेस देखील अनुपस्थित राहणार असल्याचे नमुद केले आहे.

मा. अध्यक्ष महोदय, कालच या इमारतीची पाहणी करुन अनधिकृत शेड काढण्यात आली आहे. सन्मा. सदस्यांनी सदरचे पत्र दिनांक ०७/०९/२०१० रोजी दिलेले आहे. त्यांना याबाबत माहिती नसणार !

**मा. अध्यक्ष महोदय** :-

या सभेमध्ये सन्मा. सदस्य श्री. दशरथ पालांडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर कारवाई झाली आहे. परंतु तसे त्यांना लेखी कळविलेले नाही. त्यांनाही कारवाई केल्याबाबतचे पत्र देण्यात यावे.

आजची सभा ही मा. आयुक्त सो. यांनी काढलेल्या परिपत्रकानुसार लावण्यात आलेली आहे. समितीच्या सभेला अधिकारी अनुपस्थित राहतात म्हणून आपल्याला महिन्याचा दुसरा गुरुवार नेमून देण्यात आलेला आहे. आजच्या सभेला मा. उप आयुक्त, मा. सहा. आयुक्त हे देखील अनुपस्थित आहेत. सन्मा. सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी एकही सक्षम अधिकारी याठिकाणी उपस्थित नाही. सक्युर्लर प्रमाणे बैठक लावलेली आहे. त्यांना तातडीने फोन करुन कळविण्यात यावे. ते याठिकाणी सभेला का येवू शकणार नाहीत ?

आजच्या उपस्थितीबाबत मा. महापालिका सचिव यांना पत्र देण्यात यावे. मी यापूर्वीच मा. महापालिका सचिव यांना लेखी पत्र देवून महिन्याचा चौथा बुधवार देणेबाबत विनंती केली होती. परंतु त्यांनी त्यावर काहीही निर्णय न घेता तसेच पत्र परत पाठविले आहे. होकारही दिलेला नाही व नकारही कळविलेला नाही. याबाबत आम्ही काय समजायचे ?

**<u>सन्मा. सदस्य श्री. संतोष वडवले</u> :-**

मा. अध्यक्ष महोदय, दुसरा गुरुवार हा खरोखरच आपल्या सर्वांना अडचणीचा वाटतो आहे. त्यामुळे मी या सभेमध्ये असा ठराव मांडतो की, मुख्यालयाने ठरवून दिलेल्या दुसरा गुरुवारी बैठक न लावता महिन्याच्या चौथ्या बुधवारी वर्तकनगर प्रभाग समितीची बैठक लावण्यता यावी. सदरचा ठराव मा. आयुक्त सो. यांचेकडे पाठवून पुढची सभा महिन्याच्या चौथ्या बुधवारीच लावण्यात यावी.

**<u>सन्मा. सदस्य श्री. संजय कदम</u> :-**

मा. अध्यक्ष महोदय, सन्मा. सदस्य श्री. संतोष वडवले यांनी वर्तकनगर प्रभाग समितीची बैठक महिन्याच्या चौथ्या बुधवारी लावणेबाबत ठरावाची सुचना केली आहे. त्याला माझे सर्वांच्या वतीने अनुमोदन आहे. महिन्याचा चौथा बुधवार हा सर्वांसाठी सोयीचा आहे.

**<u>मा. अध्यक्ष महोदय</u> :-**

सन्मा. सदस्य श्री. संतोष वडवले यांनी या सभेत जो ठराव मांडला आहे, महिन्याच्या चौथ्या बुधवारी प्रभाग समितीची सभा लावण्यात यावी. मी सभापती या नात्याने तातडीने हा ठराव तयार करुन मा. आयुक्त सो. व मा. महापालिका सचिव यांना पाठवून पुढची बैठक महिन्याच्या चौथ्या बुधवारी लावण्यात यावी अशी सुचना करतो.

**श्री. आंधळे** (प्रभाग अधिकारी) :-

मा. अध्यक्ष महोदय, मी आत्ताच उप आयुक्त साहेबांना फोन लावला होता. ते विसर्जन घाटांची पाहणी करुन या ठिकाणी येतो असे बोलले आहे.

**<u>मा. अध्यक्ष महोदय :-</u>**

मा. उप आयुक्त सो. हे येई पर्यंत आपण थांबायचे का ? ते येईपर्यंत आपण सभा चालू ठेवू. या पुर्वीच्या सभेमध्ये सन्मा. सदस्य श्री. भैय्यासाहेब इंदिसे यांनी ज्या अनधिकृत बांधकामाबाबत मुद्दा उपस्थित केला होता, त्यावर काय कारवाई केली ते याठिकाणी अजून सांगितलेले नाही. या समितीचे उप अभियंता श्री. महेश अमृतकर याठिकाणी आलेले नाहीत. दहा दिवसांपासून त्यांचा फोन बंद आहे. गणपती दोन दिवसांवर आलेले आहेत. परमेश्वर कृपेने काल आणि आजही पाऊस नाही. सर्वच वॉर्डांमध्ये जेथे जेथे रस्ते नादुरुस्त आहेत तेथे तेथे तातडीने काम करण्यात यावे. दिवसरात्र एक करुन गणपती बप्पांना रस्त्यावरुन जातांना अडचणीचे होणार नाही असे पहावे. ब-याच ठिकाणी रस्त्यांना खड्डे पडलेले आहेत. सर्वच सन्मा. सदस्यांना संपर्क साधून त्यांचे प्रभागामध्ये रस्त्यांची दुरुस्ती करण्यत यावी. कोणाचीही तक्रार राहणार नाही असे पहावे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करु नये. श्री. अमृतकर यांना अध्यक्ष या नात्याने विनंती केली आहे तरीही त्यांनी माझेशी संपर्क केलेला नाही. त्यांना माझी काही अडचण असेल तर तसे सांगावे. फोन करण्यास रोज निरोप दिला जातो. परंतु ते फोन करत नाहीत. माझ्या वॉर्डामध्ये देखील व्यवस्थित काम केलेले नाही. हे सांगायला मला बरोबर वाटत नाही. सदरची बैठक संपल्यानंतर पाहणी करण्यात यावी. नळपाडा येथून गावातील सर्व गणपती जातात. अजूनही रस्त्यावरील खड्डे भरलेले नाहीत. त्याठिकाणाहून साधी हातगाडी देखील जावू शकत नाही. या प्रश्नावर माझे दालनात बसून सविस्तर चर्चा करण्यात यावी. मी कुठल्याही अधिका-याची तक्रार करत नाही. परंतु नागरीकांना आम्हाला उत्तरे द्यावी लागतात. त्यांना आम्ही काय सांगू. दोन दिवसांत जास्तीत जास्त सन्मा. सदस्यांना संपर्क साधून काम करण्यात यावे. माझ्याही वॉर्डात अशीच परिस्थिती आहे. मी सभापती असून मला तक्रार करणे बरोबर वाटत नाही. तातडीने संबंधितांनी लक्ष द्यावे.

**श्री. सुभाष रावळ** (कार्य. अभियंता) :-

मा. अध्यक्ष महोदय, यापुढे कुठलाही उप अभियंता आपला दुरध्वनी बंद ठेवणार नाही. याबाबत त्यांना सक्त सुचना देण्यात येतील. रस्ते दुरुस्तीसाठी सुचना केलेल्या आहेत. गणपती पूर्वी रस्ते तयार करुन देण्याचा प्रयत्न राहणार आहे. कुठलीही तक्रार येणार नाही याची ग्वाही देतो.

**मा. अध्यक्ष महोदय :-**

आजची सभा ही गुरुवार नेमून दिल्यामुळे लावलेली आहे. आणखी काही प्रभागातील विषय असतील तर त्यावर संबंधित अधिका-यांनी काळजीपूर्वक लक्ष घालावे व कारवाईबाबत सन्मा. सदस्यांना कळविण्यात यावे.

आजची ही सभा इथेच संपल्याचे मी जाहिर करतो.

**सदर सभेत खालील विषयांना मंजुरी देण्यात आली.**

**प्रकरण क्रमांक:- ११२ विषय** :- ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. ०५ दिनांक २६/०८/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ११२ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या मा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा क्र. ०५ दिनांक २६/०८/२०१० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सन्मा. सदस्यांच्या सुचनेसह ही समिती वाचून कायम करीत आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामभाऊ लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- ११३ विषय** :- प्रभाग क्र. २१ मध्ये गांधीनगर येथील चौधरी, पांडे, नंदलाल, वाल्मिकी यांचे परिसरात प्रभाग सुधारणा निधीतून गटार व पायवाटा करणेबाबत.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ११३ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. २१ मध्ये गांधीनगर येथील चौधरी, पांडे, नंदलाल, वाल्मिकी यांचे परिसरात प्रभाग सुधारणा निधीतून गटार व पायवाटा करणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ७,९५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात लाख पंच्यान्नव हजार मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"प्रभाग सुधारणा निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ७,९५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात लाख पंच्यान्नव हजार मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- ११४ विषय** :-प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मी चिरागनगर येथील धोतरे, एकता व परब चाळ परिसरातील पायवाटांचे नगरसेवक निधीतून नुतणीकरण करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ११४ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मी चिरागनगर येथील धोतरे, एकता व परब चाळ परिसरातील पायवाटांचे नगरसेवक निधीतून नुतणीकरण करणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,५००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार पाचशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,५००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार पाचशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:-११५ विषय** :-प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मी-चिरागनगर मधील राजवाडा परिसरातील बुध्द विहार पाठीमागील भागातील गटार व पायवाटांचे नगरसेवक निधीतून नुतनीकरण करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ११५ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मी-चिरागनगर मधील राजवाडा परिसरातील बुध्द विहार पाठीमागील भागातील गटार व पायवाटांचे नगरसेवक निधीतून नुतनीकरण करणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९५,३००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंच्यान्नव हजार तीनशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९५,३००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख पंच्यान्नव हजार तीनशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:-११६ विषय** :-प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मी-चिरागनगर येथील राजवाडा परिसरातील युवा ग्रुप दुर्गा मंदिर , गायकवाड व जैसवाल चाळ भागातील पायवाटांचे नगरसेवक निधीतून नुतनीकरण करणेबाबत.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ११६ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मी-चिरागनगर येथील राजवाडा परिसरातील युवा ग्रुप दुर्गा मंदिर , गायकवाड व जैसवाल चाळ भागातील पायवाटांचे नगरसेवक निधीतून नुतनीकरण करणेबाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:-११७ विषय** :-प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मीचिरागनगर येथील राजवाडा परिसरातील गायकवाड चाळीतील गटारांचे नगरसेवक निधीतून नुतनीकरण करणे बाबत.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ११७ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मीचिरागनगर येथील राजवाडा परिसरातील गायकवाड चाळीतील गटारांचे नगरसेवक निधीतून नुतनीकरण करणे बाबतच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- ११८ विषय** :-प्रभाग क. १९ मधील लक्ष्मी चिरागनगर येथील धोतडे, एकता परब चाळ, परिसरातील गटारांचे प्रभाग सुधारणा निधीतून नुतणीकरण करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ११८ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क. १९ मधील लक्ष्मी चिरागनगर येथील धोतडे, एकता परब चाळ, परिसरातील गटारांचे प्रभाग सुधारणा निधीतून नुतणीकरण करणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४,८५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख पंच्याऐंशी हजार मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"प्रभाग सुधारणा निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४,८५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख पंच्याऐंशी हजार मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- ११९ विषय** :-प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मी चिरागनगर येथील राजावाडापरिसरातील युवा ग्रुप दुर्गा मंदिर भागातील गटारांचे नगरसेवक निधीतून नुतणीकरण करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक ११९ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. १९ मधील लक्ष्मी चिरागनगर येथील राजावाडापरिसरातील युवा ग्रुप दुर्गा मंदिर भागातील गटारांचे नगरसेवक निधीतून नुतणीकरण करणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- १२० विषय** :-प्रभाग क्र. ११ मधील पवार नगर म्हाडा वसाहत येथील प्लॉट क्र. १४६ येथे प्रभाग सुधारणा निधीतून पायवाट करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक १२० दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ११ मधील पवार नगर म्हाडा वसाहत येथील प्लॉट क्र. १४६ येथे प्रभाग सुधारणा निधीतून पायवाट करणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ३,१०,२००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख दहा हजार दोनशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"प्रभाग सुधारणा निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ३,१०,२००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख दहा हजार दोनशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:-१२१ विषय** :-प्रभाग क्र. ११ मधील पवार नगर म्हाडा वसाहत येथील प्लॉट क्र. १४६ येथे प्रभाग सुधारणा निधीतून पायवाट करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक १२१ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ११ मधील पवार नगर म्हाडा वसाहत येथील प्लॉट क्र. १४६ येथे प्रभाग सुधारणा निधीतून पायवाट करणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४,६७,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख सदुसष्ट हजार मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"प्रभाग सुधारणा निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४,६७,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख सदुसष्ट हजार मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:-१२२ विषय** :-प्रभाग क्र. ११ मधील पवारनगर म्हाडा वसाहत येथील प्लॉट क्र. १४५ येथे प्रभाग सुधारणा निधीतून पायवाट करणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक १२२ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ११ मधील पवारनगर म्हाडा वसाहत येथील प्लॉट क्र. १४५ येथे प्रभाग सुधारणा निधीतून पायवाट करणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४,१०,२००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख दहा हजार दोनशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"प्रभाग सुधारणा निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४,१०,२००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख दहा हजार दोनशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- १२३ विषय** :-प्रभाग क्र. ४० मधील तावरे यांच्या घरापासून सोंडकर यांचे घरापर्यंत प्रभाग सुधारणा निधीतून गटार व पायवाट बनविणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक १२३ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ४० मधील तावरे यांच्या घरापासून सोंडकर यांचे घरापर्यंत प्रभाग सुधारणा निधीतून गटार व पायवाट बनविणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४,९९,१५०/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख नव्यान्नव हजार एकशे पन्नास मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"प्रभाग सुधारणा निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये ४,९९,१५०/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख नव्यान्नव हजार एकशे पन्नास मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- १२४ विषय** :-प्रभाग क्र. ४० मधील साईकृपा चाळ येथे नगरसेवक निधीतून गटार व पायवाट बनविणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक १२४ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ४० मधील साईकृपा चाळ येथे नगरसेवक निधीतून गटार व पायवाट बनविणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,९००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार नऊशे मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:-१२५ विषय** :-प्रभाग क्र. ४० रामचंद्रनगर नं. ०२ मधील चळ क्र. १६ येथे नगरसेवक निधीतून गटार व पायवाट बनविणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक १२५ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

प्रकरणी गोषवारा पाहता प्रभाग क्र. ४० रामचंद्रनगर नं. ०२ मधील चळ क्र. १६ येथे नगरसेवक निधीतून गटार व पायवाट बनविणेच्या कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,८५०/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार आठशे पन्नास मात्र) चे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रशासनाने मा. वर्तकनगर प्रभाग समितीसमोर सादर केला आहे. सदरचा खर्च **"नगरसेवक निधी"** या लेखा शिर्षकाअंतर्गत करण्यात येणार आहे.

सबब, सदरचे कामासाठी येणा-या अंदाजे रुपये १,९९,८५०/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख नव्यान्नव हजार आठशे पन्नास मात्र) चे खर्चास ही समिती प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-

**अध्यक्ष**

वर्तकनगर प्रभाग समिती

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

आयत्यावेळचे

**प्रकरण क्रमांक:- १२६ विषय** :- वर्तकनगर प्रभाग समितीची मासिक सभा महिन्याच्या चौथ्या बुधवारी सकाळी ११.३० वा. आयोजित करणेबाबत.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती ठराव क्रमांक १२६ दिनांक ०९/०९/२०१०

**ठराव :-**

मा. महापालिका सचिव यांचे परिपत्रक जा. क्र. ठामपा/सचिव/२६३१ दिनांक २६/०७/२०१० नुसार वर्तकनगर प्रभाग समितीची मासिक सभा महिन्याच्या दुस-या गुरुवारी दुपारी १२.०० वा. घेणेबाबत निश्चित करुन देण्यात आले आहे. सदरची सभा ही महिन्याच्या शेवटी लावल्यास सर्व विभागाकडील विविध कामांचे गोषवारे येण्यास तसेच सर्व सन्मा. सदस्यांच्या सोयीसाठी सदरची सभा महिन्याच्या चौथ्या बुधवारी लावल्यास सर्व सन्मा. सदस्य उपस्थित राहू शकतील तसेच जास्तीत जास्त विषय विषयपत्रिकेवर घेता येतील. यासाठी मुख्यालयाने ठरवून दिलेल्या वेळेत बदल करुन सदरची सभा महिन्याच्या चौथ्या बुधवारी सकाळी ११.३० वा. वर्तकनगर प्रभाग समितीची सभा घेण्यास सर्व सन्मा. सदस्यांच्या संमतीने ही समिती शिफारस करीत आहे. सदर दिवशी सर्व अधिकारी उपस्थित राहतील याबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक :-श्री.संतोष वसंत वडवले अनुमोदक :- श्री. रामचंद्र लहू फडतरे**

सर्वानुमते मंजूर

सही /-
**अध्यक्ष**
वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**प्रत :- मा. महापालिका आयुक्त सो. यांचे माहितीसाठी व पुढील आदेशार्थ सादर....**

**(तद्‌नंतर मा. सभापती महोदय दुपारी १२.३० वा. सभा संपल्याचे जाहिर करतात.)**

सही /-
**अध्यक्ष**
वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. वर्तकनगर प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
सभा संपल्याची वेळ दुपारी १२.३० वा.
दिनांक ०९/०९/२०१०

सही /-
**प्रभाग अधिकारी**
वर्तकनगर प्रभाग समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.